डॉ.सुब्राता दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर या पदाचा प्रशिक्षण कालावधीतील अतिरिक्त कार्यभार श्री. दिलीप म. कोलते, सिनियर रिसोर्सेस सायंटिस्ट, यांना सोपविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन आदेश क्रमांकः सुसंके-२०१९/प्र.क.५७/का-१४१८
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०३ मे, २०१९

संदर्भ:- १.नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क.४५/का-१४१८,दि.१६ एप्रिल,२०१९
२.प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांचे पत्र क्र.मसुसंउकेंद्र/९७/२०१९, दि.२९ एप्रिल,२०१९

शासन आदेश

डॉ.सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांना दि.०४ मे, २०१९ ते दि.१२ मे, २०१९ (प्रवासाच्या कालावधीसह) या कालावधीमधील “डिजिटल ग्लोब, डेनवर, अमेरिका (USA)” या खाजगी संस्थेने आयोजित केलेल्या “परदेश प्रशिक्षण” दौऱ्याकरीता उपस्थित राहण्यास संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. डॉ.सुब्राता दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांना “परदेश प्रशिक्षण” दौऱ्याच्या कालावधीत संचालक या पदाचा “अतिरिक्त कार्यभार” श्री.दिलीप म.कोलते, सिनियर रिसोर्सेस सायंटिस्ट यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

३. श्री.दिलीप म.कोलते, सिनियर रिसोर्सेस सायंटिस्ट यांना त्यांच्या स्वत:च्या पदाचा पदभार सांभाळून “संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर” या पदाचा “अतिरिक्त कार्यभार” साभाळावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०३१११२०८९९१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.05.03 15:43:23 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. डॉ. सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर
२. श्री.दिलीप म.कोलते, सिनियर रिसोर्सेस सायंटिस्ट,महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर

प्रत,

१. मा.मुख्यसचिव तथा अध्यक्ष नियामक मंडळ,

२. नियामक मंडळाचे सर्व सदस्य.
३. मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२
४. प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर
५. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. निवडनस्ती,कार्यासन-१४१८.